सत्यप्रभा दि. 07.12.25

# पोक्सोतील आरोपीचा पाठलाग करुन पकडले

प्रतिनिधी • नांदेड

एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्यानंतर दाखल झालेल्या गुन्ह्यानंतर फरार झालेल्या पोक्सो गुन्ह्यातील आरोपीला भाग्यनगर पोलिसांच्या पथकाने पाठलाग करुन पकडल्याची घटना चाकूर तालुक्यातील नळेगाव येथे घडली. सदर आरोपीला अटक केल्यांतर न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपीला सोमवार पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

काही दिवसापूर्वी एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना भाग्यनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडली होती. या प्रकरणी म्हलारी उर्फ आकाश विनायक येरमुनवाड (वय २१, रा. सुनेगाव ता. लोहा) याच्यावर भाग्यनगर ठाण्यात कलम ६४ (२), (आय), (एम) ३०४ (२), ११८ (२) भान्यास सह कलम ४, ६, ८ पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान गुन्हा दाखल होताच आरोपी म्हलारी येरमुनवाड पसार झाला. त्याचा मोबाईल बंद येत असल्याने शोध घेणे अवघड झाले होते. अखेर तो आरोपी लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील नळदुर्ग येथे एका पानटपरीवर असल्याची माहिती भाग्यनगर पोलिसांना मिळाली. पोलिसांचे पथक तेथे गेले असता पोलिसांना पाहताच तो स्कुटीवरुन (एमएच-२६-सीएक्स-५६२५) पळाला. पोलिसांनी केलेला पाठलाग पाहून आरोपीने स्कुटी रस्त्यावर ठेवून शेता-शेतातून पसार होण्याचा प्रयत्न केला. अखेर पोलीस पथकाने आरोपी मल्हारी येरमुनवाडच्या मुसक्या आवळण्यात यश मिळविले. सदरची कारवाई पोअ अबिनाश कुमार, अपोअ सुरज गुरव, अपोअ अर्चना पाटील, डिवायएसपी वेंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष तांबे, पोनि महेश माळी, सपोनि अनुपमा केंद्रे, पोउपनि नरेश वाडेवाले व त्यांच्या पथकातील कर्मचाऱ्यांनी केली.